# अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शन

अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि
बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शन सुरू

: टिळक स्मारक मंदिर व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने आयोजित 37 व्या अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन 10 फेब्रुवारीला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती व 'केसरी'चे विश्वस्त-संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले. यावेळी टिमविच्या कुलगुरू व 'केसरी'च्या विश्वस्त-व्यवस्थापक डॉ. गीताली टिळक उपस्थित होत्या.

अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शन येत्या 10 फेब्रुवारी २०२५ पर्यंत टिळक स्मारक मंदिर येथे सुरु राहील. प्रदर्शनासाठी देशभरातून पाचशे चित्रे आली होती. त्यामधून 160 चित्रांची निवड करण्यात आली आहे. ही निवडक चित्रे प्रेक्षकांना पाहण्यासाठी सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत विनामूल्य खुली असणार आहेत. या निवडीसाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती. या प्रदर्शनात विजेत्यांना एकूण 15 पारितोषिके देण्यात येणार आहेत. लोकमान्य टिळक सुवर्ण पदक, लोकमान्य पारितोषिक, जयंतराव टिळक पारितोषिक, बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक, इंदुताई टिळक पारितोषिक, गौरीताई टिळक पारितोषिक अशी पारितोषिके आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने अनुक्रमे 15,000, 10,000 आणि 7,000 रुपयांची बक्षिसे विद्यार्थी चित्रकार गटासाठी आहेत. नुकतेच दिवंगत झालेले प्रसिद्ध चित्रकार रावसाहेब गुरव यांच्या नावानेही या वर्षीपासून पारितोषिक देण्यात येणार आहे.

प्रदर्शनाच्या कालावधीत पुणे व मुंबईतील नामवंत चित्रकारांचे निसर्ग चित्र, व्यक्तिचित्र, शिल्पकला, नृत्य व स्केचिंग यांचे आयोजन करण्यात आले आहे. जपानमधील कात्सुरा असाहि यांची कॅलीग्राफी कार्यशाळाही यावेळी होणार आहे. प्रदर्शन 10 ते 6 या वेळेत विनामूल्य खुले राहणार आहे. 10 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6 वाजता या प्रदर्शनाचा बक्षीस वितरण समारंभ होईल. कलाप्रेमींनी या प्रदर्शनाला भेट देऊन कलाकृतींचा आस्वाद घेण्याचे आवाहन टिमविच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक यांनी केले आहे. डॉ. गीताली टिळक, डॉ. मंजिरी भालेराव व भारत जाधव यांनी लिहिलेल्या 'कम्युनिकेशन व प्लास्टिक आर्टस' हे केसरी प्रकाशनाचे पुस्तक 10 फेब्रुवारी रोजी प्रकाशित केले जाणार आहे.

37 व्या अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते शनिवारी झाले. उद्घाटनानंतर डॉ. दीपक टिळक व डॉ. गीताली टिळक यांनी प्रदर्शनातील चित्रकृतींची पाहणी केली.










ALL INDIA LOKMANYA TILAK AND
BARRISTER OAK SMRITI ART EXHIBITION
TILAK ART
EXHIBITION



